MHRG100012002022

## <u>महाड येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात</u>
## (पिठासीन अधिकारी – एस. एस. पाटील)

**फौजदारी चौकशी अर्ज क्र.३७४/२०२२**

**श्री. वासुदेव दगडु सकपाळ** )
वय – ६४ वर्षे, धंदा – शेती, )
राहणार – विन्हेरे, ता. महाड, )
जि. रायगड. ) अर्जदार

विरुध्द

**ग्रामसेवक,** )
ग्रामपंचायत विन्हेरे, )
ता. महाड, जि. रायगड. ) सामनेवाला

## <u>निशाणी क्र.१ खालील आदेश</u>
## (जाहीर दिनांक २५/०१/२०२३)

अर्जदार यांनी त्यांचा मुलगा ओंकार वासुदेव सकपाळ यांच्या जन्माची नोंद संबंधित कार्यालयाकडे होण्याबाबत निर्देश करण्याबाबत सदरचा अर्ज जन्म मृत्यू नोंद अधिनियम १९६९ कलम १३ (३) प्रमाणे दाखल केला आहे.

०२. अर्जदाराने असे कथन केले आहे की, त्यांचा मुलगा ओंकार वासुदेव सकपाळ यांचा जन्म दिनांक १७/१०/२००१ रोजी मौजे विन्हेरे, ता. महाड, जि. रायगड येथे झालेला आहे. अर्जदार यांच्या मुलाच्या नावाचा

उल्लेख ग्रामपंचायत विन्हेरे येथे नसल्याने अर्जदार यांच्या मुलाच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत विन्हेरे यांच्या कार्यालयातील जन्म मृत्यू नोंद रजिस्टरमध्ये करण्यास संबंधित अधिकारी यांना निर्देश देण्याबाबत विनंती केली आहे.

०३. अर्जदाराने त्यांच्या अर्जाच्या पुष्टयर्थ अर्जदाराचे स्वतःचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.८ कडे दाखल केले आहे. ग्रामपंचायत विन्हेरे, ता. महाड येथे अर्जदाराच्या मुलाच्या जन्माची नोंद उपलब्ध नसल्याचा दि. ३१/०५/२०१९ रोजीचा मुळ दाखला निशाणी क्र.४/१ कडे दाखल केला आहे, अर्जदाराच्या आधारकार्डची प्रमाणित प्रत निशाणी क्र.४/२ कडे दाखल केली आहे, अर्जदाराच्या मुलाच्या शाळा सोडल्याच्या दाखल्याची छायांकीत प्रत निशाणी क्र.४/३ कडे दाखल केली आहे व अर्जदाराच्या मुलाच्या नावाचे बोनाफाईड सर्टिफिकेटची छायांकीत प्रत निशाणी क्र.१०/१ कडे दाखल केली आहे. सदर अर्जाची नोटीस निशाणी क्र.७ प्रमाणे बजावुन देखील सामनेवाला हे सुनावणीकामी गैरहजर राहिले. सबब, निशाणी क्र.१ वर आदेश पारित करुन सदरचा अर्ज सामनेवाला यांच्याविरुध्द एकतर्फा चालविण्यात आला.

०४. अर्जदार यांनी निशाणी क्र.८ कडे स्वतःचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्याचप्रमाणे निशाणी क्र.१०/३ कडे “रायगडचा आवाज“ या वृत्तपत्रामध्ये दिनांक ०६/१०/२०२२ रोजी जाहीर केलेली नोटीस हजर केली आहे.

०५. अर्जदाराने दिलेल्या शपथपत्रावरुन, मुलाच्या बोनाफाईड सर्टिफिकेट व शाळा सोडल्याच्या दाखल्यावरुन असे दिसुन येते की, अर्जदाराच्या मुलाचा जन्म दिनांक १७/१०/२००१ रोजी मौजे विन्हेरे, ता. महाड, जि. रायगड येथे झालेला आहे. सदरकामी त्रयस्थ इसम येऊन

कोणीही अर्जातील कथने नाकारली नाहीत. तसेच अर्जदाराने दाखल केलेली कागदपत्रे नाकारली गेली नाहीत. सबब, अर्जदाराचा अर्ज, तोंडी पुरावा व दाखल कागदपत्रे अबाधित राहिली आहेत. सबब, अर्जदाराचा अर्ज मंजूर करुन खालील आदेश पारित करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. ग्रामसेवक, ग्रामपंचायत विन्हेरे, ता. महाड, जि. रायगड यांना असे निर्देश देण्यात येतात की, त्यांनी योग्य ती फी आकारुन ओंकार वासुदेव सकपाळ यांचा जन्म दिनांक १७/१०/२००१ रोजी झाल्याबाबतची नोंद त्यांच्या दप्तरी करावी.

SHAIKH BABASO S PATIL
Digitally signed by SHAIKH BABASO S PATIL
Date: 2023.01.27 11:11:19 +0530

महाड (**एस. एस. पाटील**)
दिनांक – २५/०१/२०२३ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, महाड